# पुण्यातील आणखी चार रुग्णालयांत 'एनआयसीयू' सुविधा

**मुंबई :** धर्मादाय संस्था 'मुकुल माधव फाऊंडेशन'ने श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती न्यासाच्या सहयोगाने पुण्यातील ससून रुग्णालयात अद्ययावत नवजात अर्भक निगा कक्ष (एनआयसीयू) वर्षभरापूर्वी कार्यान्वित केले, आता त्या कक्षाने साधलेले सुपरिणाम पाहता पुण्यातील आणखी चार पालिकेच्या रुग्णालयात अशीच कक्ष फाऊंडेशनच्या वतीने स्थापण्यात येणार आहेत. यापैकी भारतरत्न राजीव गांधी रुग्णालय आणि सोनवणे रुग्णालयात स्थापण्यात आलेल्या एनआयसीयूचे येत्या ५ मे रोजी उद्घाटन होत आहे.

ससून रुग्णालयात स्थापित ५९ खाटांच्या एनआयसीयूमधून गंभीर व्याधींसह जन्म घेणाऱ्या बाळांवर मोफत उपचार केले जातात आणि अर्भकांच्या जीवितांचे प्रमाण ९५ टक्क्यांपर्यंत सुधारता आले आहे, अशी माहिती मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी दिली.

## परतफेड समाजऋणाची

**उद्योगांच्या सामाजिक दायित्वाच्या उपक्रमाविषयी साप्ताहिक सदर दर गुरुवारी**

पुण्यासह शेजारच्या जिल्ह्यातील गावातून येथे बालके आणली जातात आणि वर्षभरात अशा ५ हजारांहून अधिक बालकांना याचा लाभ झाला असल्याची त्यांनी माहिती दिली. ही उपयुक्तता पाहता पुण्यात आणखी चार पालिकेच्या रुग्णालयात अशी सुविधा सुरू करण्याचे काम हाती घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुण्याबाहेर राज्याच्या अन्य भागातील रुग्णालयातही बालकांच्या आरोग्यनिगेच्या सुविधा पुरविण्याच्या दिशेने मुकुल माधव फाऊंडेशनचे प्रयत्न सुरू आहेत, परंतु लालफीतशाही कारभारात प्रकल्प रखडले आहेत. पुण्याप्रमाणे स्थानिक प्रशासनाची साथ अन्यत्र नसल्याची खंत छाब्रिया यांनी व्यक्त केली.